**सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र.४ चा पुरावा.**

मी याद्वारे शपथपुर्वक निवेदन करतो की,

माझे नांव - शरद दादासाहेब शिरसाठ,
वय – ४२ वर्षे, व्यवसाय - मजुरी,
राहणार – देसवंडी, ता. राहुरी, जि. अहमदनगर.

.......................

**सरतपास शपथेवर सरकारपक्षातर्फे विधीज्ञ श्री. दिवाणे यांचे मार्फत**

**१.** घटनेच्या वेळी मी कृषी विद्यापिठात कापुस प्रकल्पामध्ये कामास होतो. दिनांक ०६/०८/२०२३ रोजी मी बागेमध्ये काम करत होतो. त्यावेळी तेथे धीरज पानसंबळ आले, त्यांनी मला विचारले शाम घोरपडे कोठे आहे. मी त्यांना सांगितले की, तो पलिकडच्या फिल्डमध्ये टॅक्टर घेऊन कामासाठी गेलेला आहे. त्यांनी मला विचारले की, तु मला दाखवितो का? तेव्हा मी सांगितले की, मी येथे कामाला आहे, मला विचारल्या शिवाय येता येणार नाही. त्यावेळी ते म्हणाले की, मी तुझे सरांना सांगतो, काही होणार नाही. मी त्यांच्या चारचाकी गाडीमध्ये त्यांच्या सोबत गेलो. ते मला पुन्हा सोडवायला आले.

२. मी ज्या सरांकडे म्हणजेच नंदकुमार भुते साहेबांकडे कामास होतो ते सर भेटले. त्यांनी आम्हाला थांबविले. मला खाली उतरण्यास सांगितले आणि कुठे गेला होता असे विचारले. तेव्हा मी सांगितले की, शाम घोरपडे पानसंबंळ यांच्या ओळखीचे आहेत, त्यांना दाखविण्यासाठी मी गेलो होतो. त्यावेळी त्यांनी मला विचारले की, तु कोणाला विचारुन गेला. त्यावेळी मी सांगितले की, त्यांच्या ओळखीचे धोंडे सर आहेत, त्यांना सांगुन गेलो होतो. त्यांनी मला ओरडले आणि बोलायला सुरुवात केली, विचारल्या शिवाय जायचे नाही, तु कसा गेला, आणि तु तुझे कामावर जा असे सांगितले. मग मी तेथुन लगेच माझे कामावर गेलो. त्यानंतर काय घडले ते मला सांगता येणार नाही.

३. मी पोलिस स्टेशनला जबाब द्यायला गेलो होतो. तसेच राहुरी कोर्टात जबाब देण्यासाठी गेलो होतो. मला आता जबाब दाखविला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर माझे सांगणे प्रमाणे बरोबर आहे. सदर जबाबास **निशाणी ३४** देण्यात येते. धीरज पानसंबंळ आज रोजी कोर्टात हजर आहे.

४. असे घडले होते की, डॉ. भुते मला बोलत होते तेव्हा धीरज पानसंबंळ म्हणाला की, मी त्याला घेऊन गेलो होतो, तुम्ही त्याला कशाला बोलता. असे काही घडले नव्हते की, धीरज पानसंबंळ यांनी त्यांना राग आल्याने डॉ. भुते यांना शिवीगाळ केली, त्यांच्या मांडीवर पाठीवर लाथा बुक्यांनी मारहाण केली. असे काही घडले नव्हते की, त्यावेळी आरोपी पानसंबंळ डॉ. भुते यांना म्हणाला की, तुम्ही माझे नादी लागलेतर तुम्ही मला बाहेर भेटा, तुम्हाला दाखवितो.

**साक्षीदार सरकारपक्षास सहकार्य करत नसल्याने त्याचा उलट तपास घेण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली.**

**उलटतपास शपथेवर सरकारपक्षातर्फे विधीज्ञ श्री. दिवाणे यांचे मार्फत**

**५.** हे म्हणणे खरे नाही की, मी पोलिसांना असे सांगितले होते की, धीरज पानसंबळ यांनी त्यांना राग आल्याने डॉ. भुते यांना शिवीगाळ केली, त्यांच्या मांडीवर पाठीवर लाथा बुक्यांनी मारहाण केली, त्यावेळी आरोपी पानसंबळ डॉ. भुते यांना म्हणाला की, तुम्ही माझे नादी लागलेतर तुम्ही मला बाहेर भेटा, तुम्हाला दाखवितो. आता मला माझे जबाबातील **पोर्षण मार्क 'अ'** वाचुन दाखविला, त्यामधील काहीकाही मजकुर मनाने लिहिलेला आहे, धमकी दिलेली नव्हती, शिवीगाळ केलेली नव्हती.

६. माझे शिक्षण सहावी पर्यंत झालेले आहे. मला मराठी लिहिता वाचता येते. हे म्हणणे खरे आहे की, मला नोटीस देऊन पोलिस स्टेशनला जबाब देण्यासाठी बोलावले होते.

**प्रश्न** - तुमच्या जबाबात चुकीचे लिहिले आहे अशी तक्रार तुम्ही पोलिसांच्या वरीष्ठांकडे केली होती काय?

**उत्तर** - मला जबाबात काय लिहिले आहे ते माहितच नव्हते, आज माहिती पडले आहे.

७. हे म्हणणे खरे आहे की, डॉ. भुते यांनी फिर्याद दिल्याचे आणि काय फिर्याद दिली आहे याची मला माहिती आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला वाचविण्यासाठी मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. फळे यांचेकडून -**

**८.** हे म्हणणे खरे आहे की, राहुरी कोर्टात जबाब देण्यासाठी मला पोलिसांनीच बोलावले होते. कोर्टात जबाब देण्याची ती माझी पहिलीच वेळ होती. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी पोलिसांनी मला काय जबाब द्यायचा ते सांगितले होते आणि त्यानुसार मी जबाब दिला.

उलटतपास पूर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

CHARATE HAMPE MANISHA
Digitally signed by CHARATE HAMPE MANISHA
Date: 2026.01.03 14:43:47 +0530

**(श्रीमती मनिषा. द. चराटे - हंपे )**
तदर्थ जिल्हा न्यायाधीश -१, तथा अति. सत्र न्यायाधीश, अहमदनगर.

दिनांक : ०३/०१/२०२६
अहमदनगर.